दैनिक साम्ययोग-

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : १०५ ) वर्धा, शुक्रवार ता. १७ जुलई १९६४ ( मूल्य ५ न.पै.



पाण्या पावसाच्या दिवसातहि तुम्ही लोक ग्रामदान यात्रेवर जाण्यासाठी उत्सुक आहा हे पाहून आनंद वाटतो.

## स्कंद--विनायक

कालच्या अंकात 'पुरुषोत्तम-गुरु' आणि 'सिद्ध-बुद्ध' ह्या नांवावरील विनोबाजींची प्रवचनें दिली होती. आजच्या अंकी 'स्कंद-विनायक' या नांवावरील प्रवचन देत आहोंत.

– संपादक

### स्कंद विनायक !

स्कंद हा एक संस्कृत शब्द आहे. परमेश्वराचे विशेषण स्कंद. स्कंद म्हणजे खंडण करणारा. असें मानलेले आहे की देवांचा सेनापती स्कंद होता. गीतेत 'सेनानीत जसा स्कंद' असें आले आहे. सेनापतीमध्यें मी स्कंद आहे. म्हणजे सेनापतीमध्ये श्रेष्ठ आहे. हें भगवन्ताचे रूप आहे. आम्ही ज्याला हल्ली सरकारचे डिफेन्स खाते म्हणतो, संरक्षण विभाग म्हणतो, तो ईश्वराचा जो भाग आहे तो स्कंद आहे.

आणि विनायक म्हणजे गणपति, ज्याला हल्ली शिक्षणाचें खाते म्हणतात स्कंद म्हणजे फार पराक्रमी. उपनिषदांत वर्णन आहे की स्कंद हे नांव सनत्कुमारांचे आहे. सनत्कुमार महाज्ञानी होऊन गेले. त्यांनी नारदाला ज्ञान दिले. नारद सनत्कुमारांपाशी गेले आणि म्हणाले की मला ज्ञान द्या. सनत्कुमार म्हणाले, तूं तर पुष्कळ शिकला आहेस. तुला काय ज्ञान द्यायचे आहे ? "ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेद अथवर्णश्चतुर्थं इतिहास-पुराणः पञ्चमो वेदाना वेदः पित्र्यो राशिर्दैवो निधिर्वाकोवाक्यमेकायनं देव-विद्या ब्रह्मविद्या भूतविद्या क्षत्रविद्या नक्षत्रविद्या सर्पदेवजनविद्या"

हे सगळे मी शिकलो आहे. ( ब्रह्म-विद्या म्हणजे ब्रह्मविद्यामंदिर काढले ते नाही. ) ब्रह्मविद्या म्हणजे ब्राह्मणाचे शास्त्र. ते मी शिकलो आहे. असे पुष्कळ मी शिकलो आहे. पण इतके शिकलो तरी अंतःकरणांतला शोक गेला नाही. "तस्मै मृदितकषायाय तमसस्पारं दर्शयति भगवान् सनत्कुमारः" तर मला शोकाच्या पार कसे जावे ते शिकवा. सनत्कुमार म्हणाले, 'तूं जे शिकला आहेस ते शब्द आहेत. ती शाब्दिकविद्या आहे. नारद म्हणाले, मग मी काय करू ? मग सनत्कुमारांनी त्याला सांगितले की अमुक कर, तमुक कर. शेवटी अध्ययन करून दिले व मग संसाराचे भय दूर केले. नारद निवृत्त झाले. कृतार्थ झाले. अशी कहाणी त्यांत आहे. सनत्कुमारांनी नारदाला, ज्याचे सर्व 'कषाय' नष्ट झाले होते, म्हणजे ज्यांचे चित्त शुद्ध झाले होते त्या नारदाला अंधःकाराच्या पार प्रकाशाचा किनारा दाखविला.

म्हणून सनत्कुमाराला स्कंद हे नांव दिले. कारण ते संसाराचे खंडन करतात. संसार, पाप खंडन करण्याची जी भगवंताची शक्ति तिला स्कंद म्हणतात आणि ज्ञान देण्याची भगवंताची जी शक्ति तिला विनायक म्हणतात. दक्षिण भारतात स्कंदाची उपासना करतात. गणपतीची उपासना भारतात करतात उत्तम शिक्षण झाले तर आंतून रक्षण होते राष्ट्र संकटांत राहत नाही आणि तेवढ्यांत संकट आले तर स्कंद काम करतो असे दोन्ही मिळून काम होत असते. म्हणून ही दोन नांवे एकत्र आली. एक जोडी सिद्ध-बुद्ध एक जोडी स्कंद-विनायक आणि एक सवितापावक. ते उद्या पाहूं.

ब्रह्मविद्या मंदिर, पवनार

६-७-६४

---o---

## स्वराज्य आंदोलनासारखा वर्धा जिल्हा चमकू दे

★ संत तुकडोजी महाराज ★

विनोबांची ग्रामदानाबाबत तीन वारदा भेट घेण्याचा व त्यांच्या पवित्र मुखातून ग्रामदानाचे वैशिष्टय ऐकण्याचा सुयोग आला. आपण कोणत्या मार्गाने सुखी होऊ शकतो ह्या संबंधी आज घराघरांत चर्चा चालली आहे. लोक गटागटाने ती चर्चा करीत आहेत. तेव्हा त्याचा लाभ घेण्याची हीच वेळ आहे. आणि नेमक्या ह्याच वेळी प्रकाशाचा विचाराचा किरण ( विनोबा व ग्रामदान ) आपल्या निकट आला आहे. आणि विनोबांनी असे महत्वाचे ठिकाण पकडले आहे की सरकार व सेवाभावी संस्था ह्यांनी ह्या जिल्हयांत चंग बांधून काम करण्याचे ठरविले आहे. ९०० ग्रामदाने व्हावीत असा ह्या जिल्हयात प्रयत्न चालला आहे.

प्रत्यक्ष दर्शनाने लोकांचे आकर्षण वाढते. मनुष्य आज हे दर्शन करण्यास उत्सुक झाला आहे. लोक पाहू इच्छितात की असा कोणता प्रांत, जिल्हा, आहे की जेथे लोक अेकमताने काम करीत आहेत. ग्रामदानानंतर भराभर कामाला लागले आहेत, तरुण धावताहेत, मुले येताहेत, शिक्षक झटताहेत, सर्वच कामाला लागले आहेत. गावात निरनिराळ्या कामासाठी समित्या बनल्या आहेत. शेती, शिक्षण, उद्योग, आरोग्य ही खाती निर्माण करून कामे चालली आहेत. गावातील भांडणे गावात मिटविली जात आहेत, जातीयता मिटत आहे. मानवधर्म शिकविला जात आहे. हे दर्शन पाहण्याची देशाची इच्छा आहे.

सत्याग्रहाच्या वेळी आणि १९५२ साली जशी गुलामी सहन करणार नाही ह्या भावनेने लोक सर्व दिशेने उठले आणि ह्या जिल्हयातहि विशेष पराक्रम प्रगट झाला तसेच ह्याहि वेळी झाले पाहिजे.

प्रजातंत्र यायचे असेल तर प्रत्येक गाव, नगर आपल्या पायावर उभे झाले पाहिजे. गाव आपसात भांडणार नाही तर वकिलावर होणारा व्यर्थ खर्च वाचेल. दोन देश भांडणार नाहीत तर देशाचा फौजेवरील खर्च वाचेल. तुम्हाला माहितच आहे की मोठी इमारत बांधण्यापूर्वी अगोदर अेक छोटा नमुना तयार करतात. व मग त्याबरहुकुम मोठी इमारत उभी होते.

आजच्या पंचायतीनेहि ग्रामस्वराज्य उभे झाले असते. १००-५०० घरांच्या गावात त्या काम करतात. पण आज पंचायती भांडणाचे अड्डे बनल्या आहेत. जुनी भांडणे पण उकरून काढतात. गटबाजी इलेक्शनबाजी वाढली आहे. ती काढली पाहिजे व गाव अेके ठिकाणी बसून चालविले पाहिजे.

त्यासाठी ग्रामदानाचा मार्ग समोर आला आहे. लोकांच्या रोगावर तो रामबाण इलाज आहे. जगात तपश्चर्या नित्य चाललेलीच असते. ईश्वर अेखाद्या-च्या वाणीतून प्रगट होतो. विनोबांच्या वाणीतून तो प्रगट होत आहे. संघर्षातून वीर निपजतात. नवे नवे लोक पुढे येऊन चमकतात. ग्रामदान तसेच कार्य आहे. तेव्हा वर्धा जिल्हयातील लोकांनी ह्यातच शक्ति लावावी. धावून धावून ह्या कामात यावे. प्रश्न विश्वासाचा आहे. तो नसेल तर ते अेक ढोंग ठरेल. विश्वास त्याच्यातच वागेल

( बाकीचे पानावर पहा )

www.vinoba.in

